# ग्रामीण भागात प्रथमच फार्मसी, अभियांत्रिकी व व्यवस्थापन शाखांचा समावेश असलेली आंतरराष्ट्रीय परिषद : फडतरे नॉलेज सिटीने घडवला ऐतिहासिक शैक्षणिक अध्याय

**कळंब–वालचंदनगर (ता. इंदापूर, जि. पुणे):**

ग्रामीण भागातील शिक्षण क्षेत्रात नवे पर्व सुरू करत फार्मसी, अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन या तीन प्रमुख व्यावसायिक शाखांचा समावेश असलेली "इंटरनॅशनल समिट ऑन फ्युचर-रेडी फार्मसी, इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट सायन्स" ही भव्य आंतरराष्ट्रीय परिषद दि. ६ व ७ फेब्रुवारी २०२६ रोजी ज्ञान, कला, क्रीडा व कृषी प्रतिष्ठान संचलित फडतरे नॉलेज सिटी, कळंब–वालचंदनगर येथे मोठ्या दिमाखात आणि उत्साहात पार पडली. ग्रामीण महाराष्ट्रात आयोजित झालेली ही पहिलीच बहुविषयक आंतरराष्ट्रीय परिषद ठरली असून, "गाव ते ग्लोबल" ही संकल्पना प्रत्यक्षात उतरल्याचे सशक्त उदाहरण या निमित्ताने पाहायला मिळाले. आजवर आंतरराष्ट्रीय परिषदा प्रामुख्याने महानगरे किंवा शहरी शैक्षणिक केंद्रांपुरत्याच मर्यादित राहिल्या होत्या. मात्र फडतरे नॉलेज सिटीने ग्रामीण भागात अशा स्वरूपाची आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करून शिक्षणाच्या प्रवाहाला नवी दिशा दिली आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांनाही जागतिक दर्जाचे संशोधन, नवोन्मेष, तंत्रज्ञान व आंतरराष्ट्रीय सहकार्य थेट आपल्या परिसरात अनुभवता येऊ शकते, हा विश्वास या परिषदेमुळे दृढ झाला आहे.

परिषदेचे उद्घाटन कॅम्पस डायरेक्टर डॉ. अरुण इंगळे यांच्या सखोल व विचारप्रवर्तक स्वागतपर भाषणाने झाले. त्यांनी आपल्या भाषणात संस्थेच्या दोन दशकांहून अधिक कालावधीतील प्रवासाचा आढावा घेतला. ग्रामीण भागात असूनही जागतिक दर्जाचे शिक्षण, संशोधन व नवोन्मेष साध्य करण्यासाठी संस्थेने केलेल्या प्रयत्नांची माहिती त्यांनी दिली. या वेळी अध्यक्ष मा. उत्तमराव फडतरे, सचिव मा. दत्तात्रय फडतरे, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जय फडतरे, सौ. कल्याणी फडतरे, डॉ. शैलजा मॅडम तसेच सर्व विश्वस्त मंडळाच्या योगदानाचा त्यांनी विशेष उल्लेख केला.

या परिषदेसाठी लंडन (यू.के.) येथून तब्बल २४ तासांचा प्रवास करून उपस्थित राहिलेले मुख्य अतिथी श्री. अब्दुल देवाले मोहम्मद (ADM) – आफ्रिका एशिया स्कॉलर्स ग्लोबल नेटवर्क (AASGON) चे ग्रुप एक्झिक्युटिव्ह प्रेसिडेंट आणि ग्लोबल साऊथ इकॉनॉमिक फोरम (GSEF) चे संस्थापक व अध्यक्ष – यांनी ग्रामीण भारतातील शिक्षण व्यवस्थेच्या क्षमतेवर जागतिक स्तरावर विश्वास व्यक्त केला. त्यांनी आपल्या भाषणात शाश्वत विकास, युवक सक्षमीकरण, सामाजिक परिवर्तन आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य यावर सखोल मंथन केले. भारतीय विद्यार्थ्यांसाठी १००% शुल्कमाफी शिष्यवृत्ती योजना, तसेच ग्लोबल साऊथ–नॉर्थ सहकार्याच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शैक्षणिक संस्थांना जागतिक नेटवर्कशी जोडण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

लँगबस्टेक युनिव्हर्सिटी, न्यू जर्सी (USA) चे प्रो-चान्सेलर डॉ. कुलदीप एस. चरक यांनी आंतरराष्ट्रीय सामंजस्य करारांचा (MoU) उद्देश स्पष्ट केला. संशोधन, नैतिक मूल्ये, जागतिक ज्ञानविनिमय आणि विद्यार्थ्यांसाठी आंतरराष्ट्रीय संधी निर्माण करण्यावर त्यांनी भर दिला. ग्रामीण भागातील संस्थांशी थेट आंतरराष्ट्रीय विद्यापीठांचे सहकार्य हे भविष्यातील शिक्षणाचे नवे मॉडेल ठरेल, असे मत त्यांनी व्यक्त केले. अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठाचे उपाध्यक्ष डॉ. ई. बी. खेडकर यांनी विद्यार्थ्यांना आणि संशोधकांना उद्देशून प्रेरणादायी भाषण केले. संशोधनातील सातत्य, नवोन्मेषाची वृत्ती आणि सामाजिक बांधिलकी यांचा समतोल साधण्याचे आवाहन त्यांनी केले. याशिवाय डॉ.

राजेंद्रकुमार टेटेड, डॉ. एल. के. त्रिपाठी, डॉ. अनंदराव दडस, डॉ. धनंजय बागुल, डॉ. पिसाळ आदी मान्यवरांनी विविध विषयांवर सखोल मार्गदर्शन केले.

ही परिषद केवळ एका शाखेपुरती मर्यादित न राहता बहुविषयक स्वरूपाची होती. फार्मसी क्षेत्रात औषधनिर्मिती, डिजिटल हेल्थ, रेग्युलेटरी अफेअर्स, फार्माकोव्हिजिलन्स, क्वालिटी कंट्रोल यावर चर्चा झाली. अभियांत्रिकी शाखेत आर्टिफिशियल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग, ऑटोमेशन, इंडस्ट्री 4.0, शाश्वत अभियांत्रिकी यांचा समावेश होता. व्यवस्थापन क्षेत्रात नेतृत्व विकास, उद्योजकता, डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन, नवोन्मेष व्यवस्थापन, शाश्वत विकास धोरणे यावर सत्रे पार पडली.

परिषदेच्या दुसऱ्या दिवशी डॉ. प्रफुल्ल चौधरी यांनी संगणकीय संशोधनासाठी विविध ऑनलाइन टूल्सवर सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. दिदार अली तांबोळी यांनी फार्मास्युटिकल क्वालिटी कंट्रोल, GMP, GLP आणि आंतरराष्ट्रीय नियामक अनुपालनाबाबत महत्त्वपूर्ण माहिती दिली. या सत्रांना विद्यार्थी व संशोधकांचा मोठा प्रतिसाद लाभला.

या आंतरराष्ट्रीय परिषदेस १००० हून अधिक प्रतिनिधींची नोंदणी, १५० संशोधन पेपर्स / पोस्टर सादरीकरणे, १० हून अधिक विद्यापीठांचा सहभाग, ४०० विद्यार्थी व १०० प्राध्यापक सहभागी झाले होते. देशासह परदेशातील संशोधकांनी ग्रामीण भागात आयोजित परिषदेत सहभाग घेणे हे या परिषदेमधील सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरले.

या परिषदेदरम्यान AASGON (लंडन), GSEF (यू.के.) आणि Langbustech University (USA) यांच्याशी आंतरराष्ट्रीय सामंजस्य करार करण्यात आला. “स्मार्ट व्हिलेज ते स्मार्ट सिटी” ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी हे सहकार्य मैलाचा दगड ठरणार असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

परिषदेच्या समारोपप्रसंगी मौखिक व पोस्टर सादरीकरणातील विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड निर्माण होणे हीच या परिषदेची सर्वात मोठी उपलब्धी असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. एकूणच ही परिषद ग्रामीण भागातील शिक्षणासाठी ऐतिहासिक व दिशादर्शक ठरली. फडतरे नॉलेज सिटीने ग्रामीण भागात असूनही आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण, संशोधन व सहकार्य शक्य असल्याचे सिद्ध करून दाखवले. ही परिषद केवळ एक शैक्षणिक कार्यक्रम न राहता ग्रामीण भारताच्या जागतिक शैक्षणिक प्रवासातील मैलाचा दगड ठरल्याचे मत शिक्षणतज्ज्ञांनी व्यक्त केले.

ही शैक्षणिक परिषद घेण्यासाठी डॉ. प्रवीण उत्तेकर, डॉ. विपुल निंबाळकर, डॉ. सोनाली देशमुख त्याचप्रमाणे सर्व विभाग प्रमुखांनी त्यात सहभाग घेतला होता या परिषदेच्या दरम्यान फडतरे नॉलेज सिटी मध्ये वर्षातून दोन शैक्षणिक परिषदा घेण्याचे ठरले त्याप्रमाणे आता आंतरदेशीय परिषद डिसेंबर 2026 मध्ये घेण्याचे ठरले आहे.